## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहिल्यानगर, पिन ४२३ १०९.

फोन नं.(०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in) (E-mail – purchase@sai.org.in)

### जाहीर ई-निविदा सूचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचा-यांसाठी रेमंड कंपनीचे गणवेष कापड खरेदीकामी रेमंड कंपनी, रेमंड कंपनीचे पुरवठाधारक व वितरक यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदेचे निकष,अटी / शर्ती व ई-निविदेचे माहितीसाठी श्री साईबाबा संस्थानचे www.sai.org.in./tender या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि.२३/११ /२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि.७/१२/२०२४ सायं ०५.०० वा पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिर्डी- ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहिल्यानगर**


दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय**-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३


## श्री साईबाबा संस्थानचे कर्मचा-यांना गणवेषासाठी कापड पुरविणेबाबत ई-निविदा-२०२४

**A. निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे कर्मचा-यांना गणवेषासाठी कापड पुरविणेबाबत ई-निविदा**

**B. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

४. **Raymond कंपनीचे अधिकृत विक्रेते/डिलरशिप असल्याचे सन २०२४ मधील नजीकच्या दिनांकाचे प्रमाणपत्र ऑनलाईन ई- निविदेत जोडणे बंधनकारक राहील.**

५. **संस्थानच्या मागणीप्रमाणे कापड पुरविणेकामी Current date Authorization letter from Raymond Company, for supply of cloth as per Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi's demand with cloth specification and E-Tender Id असे रेमंड कंपनीकडून प्रमाणित केलेले पत्र जोडणे बंधनकारक आहे.**

६. **ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या ३ आर्थिक वर्षांची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू. ५० लाख असणे अनिवार्य राहील. तसे उलाढाल नमुद असणारे व निविदेसोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.**

**C. पुरवठा करावयाच्या साहित्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. गणवेष कापडाचे वर्णन रेमंड कंपनीचे कापडाचे कोड नंबर ई-निविदेतील BOQ मध्ये दिलेला आहे. सदर BOQ मध्ये दर नमुद करुन निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदा फी रक्कम रु.५,४००/- व बयाणा रक्कम रु.९०,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.

**D. निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि.२३/११ /२०२४ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. ७ /१२ /२०२४ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२ सदर निविदेत दर भरतांना गणवेष कापड यामध्ये रेमंड कंपनीचे शर्ट व पॅण्टचे कापडाचे ऑनलाईन दर भरावेत.

३. पुरवठा करावयाचा गणवेष कापडाचा अंदाजे तपशील BoQ मध्ये देण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन सदर निविदा Online सादर करावयाची आहे.

४. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

५. शक्य झाल्यास दि. ९/१२/२०२४ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचेच कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

६. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी शक्य असल्यास उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

**E. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS,TDS अगर इतर कुठलाही शासकीय कर,पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च,जकात,वाराई, हमाली वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार किंवा संबंधित विभागामध्ये पोहोचचे वाहतूक खर्च या सर्व बाबींचा ऑनलाईन दर भरतांना विचार करुन सर्व कर व खर्चासह दर भरावेत.

२. शासन नियमानुसार सध्या लागू असलेले व वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २%GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची अधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३. पुरवठादाराने online निविदेत दर भरतांना काळजी पुर्वक भरावेत नजरचुकीने दर भरले आहेत अशा सबबी विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**F. ऑनलाईन निविदा उघडण्याची निवडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांचेच कमर्शिअल बीड उघडण्यात येतील.

२. कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन निविदाधारकांच्या दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

३. कोणतीही निविदा मंजूर/नामंजूर करण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थानवर बंधनकारक असणार नाही.

**G. कापड पुरवठा करावयाचे ठिकाण-**

१. निविदेत नमूद केलेल्या गणवेष कापडाचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे भांडार किंवा संबंधित विभाग अगर बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल.

**H. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत सदर कापडाचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर कापडाचा पुरवठा केलेनंतर पुरवठादाराने मागणी केलेनंतर परत करणेत येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर व्याज मिळणार नाही. निविदेत अपात्र ठरलेल्या निविदाधारकांची बयाना रक्कम परत केली जाईल, निविदेत पात्र ठरलेल्या निविदाधारकाची बयाना रक्कम ३% सुरक्षा अनामत रक्कमेमध्ये वर्ग केली जाईल.

२. पुरवठादाराने शिर्डी येथे समक्ष येऊन रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी पुरवठाधारकास आदा करावी लागेल.

...०३...

**I. कापडाचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. पुरवठा आदेश दिल्यापासून ९० दिवसांमध्ये टप्प्याटप्प्याने रेमंड कंपनीचे शर्ट व पॅण्टचे कापड सुटींग व शर्टिंगच्या नंबर कोडप्रमाणे व मान्य नमुन्याप्रमाणे पुरवठा करावे लागेल.

२. सदर गणवेष कापड पुरविणेचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त कापडाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास त्याचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमूद केलेले परिमाणाइतके सर्व गणवेष कापड खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

**J. कापड स्वीकार करण्याची पध्दत-**

१. मागणी केलेले गणवेष कापड परिशिष्टात (BOQ) दर्शविलेल्या वर्णनाचेच पुरवावे लागेल. सामान्य प्रशासन विभागाकडील संबंधीत कर्मचा-यांनी पुरविलेल्या कापडाची तपासणी केल्यानंतर पुरवठा आदेशाप्रमाणे असल्यासच ते स्विकारले जाईल. वेगळयाच प्रकारचे कापड असल्यास ते स्विकारले जाणार नाही कापड स्वीकारले नाही तर ते स्वखर्चाने तात्काळ परत घेवून जाणे आपलेवर बंधनकारक राहील. ते परत न नेल्यास, त्यांचे नुकसान झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी जबाबदार राहणार नाही.

२. ई-निविदेतील कंपनी/वर्णनाप्रमाणेच शर्ट व पॅण्ट कापडाचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिल सादर करावे.

३. श्री साईबाबा संस्थानने दिलेले कापडाचे कलरमध्ये काही बदल करावयाचे झाल्यास त्याप्रमाणे निविदाधारकाने नवीन कापडाचे शेड उपलब्ध करुन द्यावे लागतील. त्याप्रमाणे रंगसंगती निश्चित करुन अंतिम करणेत येईल. त्यात कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

४. मंजूर झालेल्या दराने शर्ट व पॅण्टचे कापड पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ/दरवाढ दिली जाणार नाही/ मागता येणार नाही.

५. गणवेष कापडाची पोहोच पुरवठाधारकाने त्याचे स्वखर्चाने शिर्डी येथील संस्थानचे भांडार किंवा संबंधित विभागाकडे पॅकींग व फॉरवर्डींगसह दिली पाहिजे. भांडारात साहित्य उतरविण्याची वाराई व हमाली पुरवठाधारकास द्यावी लागेल.

**K. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१. न्युनतम दरधारकाचा गणवेष कापडाचा नमुना गरज भासल्यास संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत सक्षम प्रयोगशाळा / संस्था यांचेकडून तपासून घेण्यात येईल. निविदेत नमूद रेमंड कंपनीचे सुटींग व शर्टिंगच्या नंबर कोडप्रमाणे कापड नसल्यास न्युनतम दरधारकावर संस्थान प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येऊन बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल अगर याबाबत संस्थान प्रशासन घेईल तो निर्णय आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**L. बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या गणवेष कापडाचे बिल हे कापडाचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची सामान्य प्रशासन विभागाची खात्री झाल्यावरच त्यांचे अभिप्रायनुसार आदा करणेत येईल. सदर पुरवठयापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. संस्थानकडून कुठलाही खर्च वेगळा दिला जाणार नाही.

...०४...

२. पुरवठादाराने संस्थानकडे सादर केलेले बील ४५ दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा संस्थानचा प्रयत्न राहिल. तथापी बील आदा करण्यास तांत्रिक कारणास्तव विलंब झाला तरीही कापडाचा पुरवठा थांबविता येणार नाही.

३. पुरवठाधारकाने पुरविलेले शर्ट व पॅण्टचे कापड संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून कापड खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातुन केली जाईल.

४. शासन नियमानुसार लागू असलेल्या व लागू होणा-या सर्व कर कपाती बिलातून करण्यात येतील.

**M. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील गणवेष कापड मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या गणवेष कापडाची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीतजास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या गणवेष कापडाची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५०% दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. गणवेष शर्ट व पॅण्टचे कापड पुरवठा आदेशानुसार कळविल्याप्रमाणे वेळेत पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशाइतके गणवेष कापड बाजारातून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या गणवेष कापडासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पूर्वीच्या/नंतरच्या आलेल्या गणवेष कापडाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. निविदेतील मागणी/ वर्णनाप्रमाणे व मंजुर दराने गणवेष कापडाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने गणवेष कापडाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा गणवेष कापडाचा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन गणवेष कापड खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. अगर याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक गणवेष कापडाचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात दरवाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात दरवाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

...०५...

**N. निविदा वैधता कालावधी-**

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी ऑनलाईन निविदा भरण्याचे अंतिम दिनांकापासून १२० दिवसांचा राहील.

**O. सर्व साधारण अटी शर्ती**

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

३. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजूर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात साहित्य पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या कापडाच्या ५० टक्के कापडाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण कापडाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

४. BOQ मध्ये असलेली कर्मचारी संख्या यामध्ये प्रत्यक्ष कार्यादेश देतेवेळी वाढ किंवा घट होऊ शकते. त्यानुसार शर्ट व पॅण्टचे कापड पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील.

५. पुरवठादाराने गणवेष कापडाचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल अगर याबाबत संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

६. विलंबानंतर गणवेष कापडाचा पुरवठा केल्यास ते स्विकारण्याचे बंधन श्री साईबाबा संस्थानवर राहणार नाही.

७. कोणतीही निविदा अंशतः/पूर्णतः स्विकारणे/नाकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

८. संस्थानने तांत्रिक निविदेसोबत ऑनलाईन मागविलेले कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे ऑनलाईन सादर करु नयेत. त्याचा विचार केला जाणार नाही.

९. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील. निविदाधारकांनी भरलेली निविदा फी कुठल्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

१०. निविदेतील साहित्याचे Specification बाबत अगर निविदेबाबत काही अधिक माहिती हवी असल्यास कृपया ०२४२३-२५८७७१/७७२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

...०६...

११. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ---------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------------------------------------

शाखा २. ------------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------------------

दिनांक :- / /२०२४

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

## अ) Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना (उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST Number Certificate किंवा ऑनलाईन GST Number Registration Receipt

३. पॅन कार्ड

४. Raymond कंपनीचे अधिकृत विक्रेते/डिलरशिप असलेबाबतचे सन २०२४ मधील नजीकच्या दिनांकाचे कंपनीचे प्रमाणपत्र

५. संस्थानच्या मागणीप्रमाणे कापड पुरविणेकामी Current date Authorization letter from Raymond Company, for supply of cloth as per Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi's demand with cloth specification and **E-Tender Id** असे रेमंड कंपनीकडून प्रमाणित केलेले पत्र.


६. सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या ३ आर्थिक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रु.५० लाखापर्यंत असलेबाबतचे सोबतचे नमुन्याप्रमाणे सी.ए.यांचे प्रमाणपत्र.

दिनांक - / /२०२४

ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**





प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहिल्यानगर.

**विषय– श्री साईबाबा संस्थानचे कर्मचा-यांना गणवेष कापड पुरविणेबाबत ई-निविदा.**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्या मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या कापड आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे मागणीनुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार किंवा संबंधित विभागात पोहोच करण्याची हमी देतो. सदर गणवेष कापड पुरविणेचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त कापडाची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

माझी/आमची निविदा मंजूर झाल्यास मंजूर दराने गणवेष कापड पुरवठा करण्याची हमी म्हणून मंजुर पुरवठा आदेश एकुण रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यानंतर त्वरित मी/आम्ही रोख/RTGS/NEFT द्वारे भरणा करु. याकामी भरलेली बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करणेस मी/आम्ही संमती देत आहोत. तसेच रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटराईज्ड करुन देऊव मंजूर दराने निविदा कालावधीत गणवेष मागणीप्रमाणे वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात किंवा संबंधित विभागात पोहोच करणे माझेवर/आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक :- / /२०२४
ठिकाण :-

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव
(१) -
(२) -
सोबत- कागदपत्रे

सही/सहया व शिक्का

# वार्षीक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे निविदेसंबंधित व्यवसायाची सन २०२१-२२,२०२२-२३ व २०२३-२४ या ३ आर्थिक वर्षाची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०२१-२२ | |
| २ | सन२०२२-२३ | |
| ३ | सन२०२३-२४ | |
| | एकुण | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :-    /    /२०२४
ठिकाण :-

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
(नाव/ सही शिक्का)
नोंदणी क्रमांक.

## SANSTHAN EMPLOYEE UNIFORM CLOTH ANNEXURE

| Sr.No. | Cloth Specification | Quantity | Unit (Metre) | All Inclusive Rate Per Metre | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Raymond Shirting Cloth**<br>Code No. - 0001324/8 (36 Panha) | 7150 | Metre | | |
| 2 | **Raymond Suiting Cloth**<br>Code No.- 8325.125935/4 | 3575 | Metre | | |
| 3 | **Raymond Cloth**<br>Colour - Khaki<br>Code No. - 4030001019<br>Shade No. - 236 | 1374 | Metre | | |
| 4 | **Raymond Trevino Fabric Shirting Cloth**<br>Colour - Sky Blue<br>Code No- 0001194<br>Shade No. - 08 | 102 | Metre | | |
| 5 | **Raymond Sapphire Fabric Suiting Cloth**<br>Colour - Navy Blue<br>Code No- 3041005384<br>Shade No. - 0009 | 80.60 | Metre | | |
| 6 | **Raymond Trevino Fabric Shirting Cloth**<br>Colour - White<br>Code No- 5030002824<br>Shade No. - 0024 | 3.40 | Metre | | |
| 7 | **Raymond Sapphire Fabric Coat Cloth**<br>Colour - Navy Blue<br>Code No- 3041005384<br>Shade No. - 0009 | 2 | Metre | | |

**(Goraksha Gadilkar, I.A.S.)**
**Chief Executive Officer**
**Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi.**